महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२०००५एसजीसी१५३६४५

दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत कान्हेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

पी-कॉम/लेखा/पाणी पुरवठा/सवलत/ No-6062 दिनांक : 17.03.2017

## वाणिज्य परिपत्रक क्र.२८३

**विषयः महाराष्ट्रातील पाणी पुरवठा योजनांना वीज बिल भरण्यास द्यावयाच्या सवलतीबाबत.**

**संदर्भः** १) क्र.संकिर्ण/महावितरण/५८३४ दि.१५.०३.२०१७.

२) महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.९६/ऊर्जा-५ दि.१६.०३.२०१७.

महाराष्ट्रातील सार्वजनिक पाणी पुरवठा व उच्चदाब उपसा जलसिंचन योजनेकरीता महावितरण कंपनीमार्फत वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. सदर वर्गवारीच्या थकबाकीमध्ये असलेल्या ग्राहकांसाठी खालीलप्रमाणे वीज बिल भरण्यासंबंधी सवलत योजना लागू करण्यात येत आहे.

**सवलतीः**

१) सदर सवलत योजना सार्वजनिक पाणी पुरवठा योजना व उच्चदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकांसाठी लागू राहील.

२) सध्या असलेल्या मुळ थकीत रक्कमेपैकी २०% रक्कम व चालू महिन्याचे पूर्ण वीज बिल ग्राहकाने भरल्यानंतर वीज जोडणी पूर्ववत करण्यात येईल.

३) उर्वरित मुळ रक्कम पुढील चार मासिक समान हप्त्यांमध्ये भरण्याची सवलत ग्राहकाला देण्यात येईल. सदर चार हप्ते हे एप्रिल, मे, जून व जुलै या महिन्यांच्या चालू वीज बिलासोबत भरणे आवश्यक आहे. सवलत दिलेले हप्ते चालू वीज बिलासोबत न भरल्यास वीज पुरवठा ताबडतोब खंडीत करण्यात येईल.

४) सदर सवलत ही वीज पुरवठा अजून खंडीत न झालेल्या परंतू थकीत असलेल्या सार्वजनिक पाणी पुरवठा योजना व उच्चदाब उपसा जलसिंचन योजनेतील ग्राहकांनाही लागू राहील (मुळ रक्कम २०% व चालू वीज बिल त्वरित न भरल्यास हया ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येईल).

५) सदर ग्राहकांकडील व्याज व दंडनीय रक्कमेचा तपशिल विद्युत बिलावर वेगळा दर्शविण्यात येईल व याबाबत शासन निर्णयानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते की, उपरोक्त वाणिज्य परिपत्रकान्वये त्वरीत अंमलबजावणी करावी.

17.3.2017

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सविनय सादरः**

**मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान). महावितरण, प्रकाशगड, बांद्रा, मुंबई.**

--- उपरोक्त परिपत्रकामध्ये तरतूदीनुसार सार्वजनिक पाणी पुरवठा व उच्चदाब जलसिंचन योजना ग्राहक सदर सवलत योजनेमध्ये सहभागी होतील अशा विद्युत ग्राहकांच्या थकबाकी, वसुली, व्याज व दंडनीय व्याज रक्कमेबाबतचा स्वतंत्र अभिलेख ठेवावा.

**प्रत रवाना : प्रेषण यादीप्रमाणे.**

D:\Amit Padwal\Acctts\Circular\Draft Circular for PWW Consumer.doc